## कळवा आणि कासारवडवली पोलीस ठाण्याचे लोकार्पण

## पोलिसांना घरे मिळण्यासाठी पंतप्रधान आवास योजनेत ठाणे पालिकेने प्रस्ताव तयार करावा – मुख्यमंत्री

ठाणे दि ३०: कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या पोलिसांना त्यांची स्वत:ची हक्काची घरे मिळालीच पाहिजेत यादृष्टीने राज्य शासन प्रयत्न करीत असून **ठाणे पालिकेने येथील पोलिसांच्या घरासाठी पंतप्रधान आवास योजनेतून प्रस्ताव तयार करून संपूर्ण राज्याच्या दृष्टीने आदर्शवत असे पाऊल टाकावे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

ठाणे महानगरपालिकेने शहरातील पारसिक आणि कावेसर या दोन्ही सुविधा भूखंडावर बांधण्यात आलेल्या कळवा आणि कासारवडवली पोलीस ठाण्याचा लोकार्पण सोहळा आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून तर महापौर मीनाक्षी शिंदे अध्यक्षस्थानी होत्या. कासारवडवलीचे प्रत्यक्ष तर कळवा पोलीस ठाण्याचे ऑनलाईन पद्धतीने यावेळी उद्घाटन करण्यात आले.

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले कि, पोलिसांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर त्यांच्याकडून चांगले काम होईल, ही जाणीव ठेवून शासन पातळीवर पोलिसांच्या घरांचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येत आहे. ठाण्यातील वर्तकनगर आणि पोलीस आयुक्तालयाच्या नजीकच्या वसाहतींचा पुनर्विकास प्राधान्याने करण्यास आम्ही मंजुरी देऊत असेही ते म्हणाले.

सुविधा भूखंडावर टीडीआरच्या माध्यमातून पोलीस ठाणी बांधण्याची चांगली कल्पना आहे. सर्वसामान्यरित्या अशा भूखंडांचा विकास करतांना उद्याने, वाचनालये, सभागृह यांना प्राधान्य दिले जाते मात्र सर्व शहरांमध्ये आता ठाण्याप्रमाणे सुविधा भूखंडांचा विकास करतांना विकासकांच्या माध्यमातून पोलीस ठाणी बांधण्यात आली तर पोलिसांची कार्यालये व निवास आदि गोष्टी दर्जेदार व सुविधायुक्त होतील असेही मुख्यमंत्री म्हणाले.

सर्व पोलीस ठाणी ऑनलाईन करण्यात येत असून पुणे येथे ई कम्प्लेंट प्रणालीचा प्रयोग यशस्वी झाला असून त्याच धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही प्रणाली सुरु करावी म्हणजे एफआयआर साठी पोलीस ठाण्यात जाण्याची गरज पडणार नाही. या यंत्रणेला आधारशी जोडल्यास अधिक परिणामकारकपाने काम करता येईल असेही मुख्यमंत्री म्हणाले. विकासाच्या प्रश्नांवर ठाण्यामध्ये सर्व पक्षांत एकी असते ही चांगली गोष्ट असून ठाण्याच्या बाबतीतले प्रशन आपण प्राधान्याने सोडवूत असे त्यांनी आश्वस्त केले.

यावेळी बोलतांना पालकमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले कि,ठाण्याच्या विकासात पोलिसांचेही मोठे योगदान असून जातीय सलोखा असो किंवा रस्ता रुंदीकरण आणि अतिक्रमणांचा विषय असो, पोलीस

आणि पालिका अधिकारी तसेच प्रशासन हे नेहमीच एकमेकांच्या समन्वयाने कारवाई करते. पोलिसांनात्यांच्या ठाण्यांसाठी चांगली इमारत आणि सुविधा मिळाल्यास त्यांच्यावरचा ताण निश्चितपणे कमी होईल. वर्तकनगर येथील पोलीस वसाहती धोकादायक झाल्या असून त्यांचा लवकरात लवकर पुनर्विकास करावा असेही ते म्हणाले.

यावेळी गृह विभागाचे अपर मुख्य सचिव सुधीर श्रीवास्तव म्हणाले की, एकीकडे आधुनिकतेची कास धरतांना मुख्यमंत्री कल्पकतेलाही प्रोत्साहन देतात. साधनांची कमतरता असतांना अशा रितीने टीडीआरच्या वापरातून पोलिसांसाठी ठाणी बंधने ही कल्पकता आहे.

यावेळी बोलताना पोलीस महासंचालक सतीश माथुर म्हणाले की, पुढील वर्षी कासारवडवली हे पोलीस ठाणे हे एक उत्कृष्ट ठाणे म्हणून गौरविले जावे.

प्रारंभी अतिरिक्त आयुक्त सुनील चव्हाण यांनी ठाणे पालिकेच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या शहरातील वाय फाय सेवा, अंध दिव्यांगांसाठी साधन केंद्र, पालिका विद्यार्थ्यांसाठी विमा कवच यांचाही समावेश होता. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण तसेच ईज ऑफ डूईंग बिझिनेस या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

ठाणे पालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या उपक्रमशीलतेचे यावेळी मुख्यमंत्री तसेच मान्यवरांनी कौतुक केले तसेच सुधीर श्रीवास्तव यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही करण्यात आला.

पालिकेने पोलिसांसाठी आरक्षित जागेवर बांधकाम केले असून त्याबदल्यात संबंधित बिल्डरला जागेचा टीडीआर अर्थात विकास हक्क हस्तांतरित केले आहेत. त्यामुळे पोलिसांना विना मोबदला या पोलीस ठाण्यांचे बांधकाम करुन देण्यात आले आहे. डायघर पोलीस ठाण्याच्या बांधकामाचा काही खर्च महापालिका तर काही खर्च राज्य शासनाने केला आहे.मनीष मेहता, अभिषेक परमार तसेच समीर नातू या विकासकांचा तसेच वाय फाय सेवा यंत्रणा उभारणाऱ्या इन्टेक ऑनलाईनच्या व्यवस्थापकांचा यावेळी सत्कार करण्यात आला

कळवा पोलीस ठाण्याचा कारभार कळव्यातील ठामपाच्या शाळा क्रमांक ७१ व ७२ मध्ये १९९९ पर्यंत सुरू होता. त्यानंतर जागेअभावी हद्दीच्या बाहेर म्हणजे आरटीओ कार्यालयाच्या बाजूला असलेल्या पत्र्याच्या बराकीत कामकाज सुरु झाले होते. पण आता हक्काची चांगली जागा मिळाल्याने पोलीस आणि नागरिक या दोघांचीही मोठी सोय होणार आहे.

या कार्यक्रमास खासदार डॉ श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, जितेंद्र आव्हाड, संजय केळकर, निरंजन डावखरे, रवींद्र फाटक, पोलीस आयुक्त परम बीर सिंह, उपमहापौर रमाकांत मढवी, जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर, अतिरिक्त आयुक्त समीर उन्हाळे उपस्थित होते.